**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ चे तरतुदीन्वये निदेश.**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे संपूर्ण कार्यक्षेत्र व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने दि.१०.१०.२०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नियुक्ती केलेल्या कार्यक्षेत्राकरीता मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागु करणेबाबत...

# निदेश

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १५.०७.२०२६**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-१८२५/१५०/प्र.क्र.८४/२०२५/निदेश/नवि-१३** :- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-त मधील खंड-ग आणि महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९९ चे कलम २(ग) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टिपीएस-१८९९/११९१/प्र.क्र.८०/९९/नवि-१३, दि.२३.०७.१९९९ अन्वये, पुणे शहराच्या सभोवतालचे काही क्षेत्र भारतीय संविधानाच्या भाग-९-अ च्या प्रयोजनार्थ "पुणे महानगर प्रदेश" म्हणून घोषित केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/नवि-१३, दि.३१.०३.२०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ४२क, ४२ग व ४२च अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन पुणे महानगर क्षेत्रास, पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ४२क नुसार घोषित करुन कलम ४२ग नुसार या घोषित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रदेश विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) गठीत केले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम-३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२.१२.२०२० (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये संपूर्ण राज्याकरीता, बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर काही नियोजन प्राधिकरणे वगळता, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केलेली असून (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आला आहे.) ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीमध्ये उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्राकरीता सदर नियमावली, पुणे महानगर प्रदेशाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल, असे नमूद आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये दि.०२.०८.२०२१ रोजी पुणे महानगर प्रदेशाकरीता प्रारुप विकास योजना आराखडा प्रसिध्द केलेला होता. तथापि, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने शासन राजपत्रात भाग-१ असाधारण, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दि.२७.०९.२०२५ रोजीच्या प्रसिध्द अधिसूचनेद्वारे, उक्त महानगर क्षेत्रासाठी तयार केलेल्या प्रारूप विकास योजना आराखड्याकरिता उक्त अधिनियमाचे कलम २३, २६ व २८ अंतर्गतची (या पुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) सर्व कार्यवाही रद्द करुन सदर प्रारूप विकास योजना आराखड्याची प्रक्रिया मागे घेतलेली आहे;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.१२.०२.२०२५ रोजीच्या १२ व्या प्राधिकरण सभेमध्ये, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा मा. अध्यक्ष, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी शासनाने मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू करणेबाबत सहमती असून तसा प्रस्ताव प्राधिकरणाने शासनाकडे सादर करणेबाबतच्या ठरावास मान्यता प्रदान केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर ठरावाच्या अनुषंगाने उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.०८.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रास मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू करण्याची विनंती शासनास केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.१०.१०.२०२४ रोजी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील बाह्य वळण मार्ग व त्यालगत एकुण २ ग्रोथ सेंटरचा विकास करणेकरिता ६६८.०० चौ. किमी. क्षेत्र व ११७ महसुली गावांकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करणेबाबत अधिसूचना निर्गमित केलेली असून सदर

कार्यक्षेत्रामध्ये अद्यापही उक्त प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरीता लागु असलेली सन २०१८ ची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रालगत असणाऱ्या नियोजन प्राधिकरणांना UDCPR नियमावली लागू असून, त्यानुसार सदर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रालगत असलेल्या इतर नियोजन प्राधिकरणांच्या समकक्ष प्राधिकरण आहे, त्यानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरीता राज्यातील इतर नियोजन प्राधिकरणांप्रमाणे एकत्रित व सुसंगत सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विनंतीमधील व्यापक जनहित विचारात घेऊन पुणे महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच लगतच्या क्षेत्राशी सुसंगत व नियोजनबध्द विकास होण्याच्या दृष्टीने, संपूर्ण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र व शासनाने दि.१०.१०.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ करीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेल्या कार्यक्षेत्राकरीता देखील मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये प्राप्त अधिकारात खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

## शासन निदेश

**अ.** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे संपूर्ण कार्यक्षेत्र व शासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून दि.१०.१०.२०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नियुक्ती केलेल्या कार्यक्षेत्राकरीता, शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.०२.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू करणेत येत आहे.

**ब.** सदरचे शासन निदेश लगोलग लागू होतील.

सदरचे निदेश शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने*

(प्रणव कर्पे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

**प्रत कार्यवाहीसाठी :**

१. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

३. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

४. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा कार्यालय, पुणे.

**प्रत माहितीसाठी :**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. उप मुख्यमंत्री महोदय (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उप मुख्यमंत्री महोदया (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

८. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. विभागीय आयुक्त, पुणे.

११. जिल्हाधिकारी, पुणे.

१२. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

१३. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

१५. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- सदरचे निदेश या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

१६. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- सदरचे निदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

१७. निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३)

*******************

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32
सत्यमेव जयते